# मानसिक आजारांकडे गांभीर्याने पहावे डॉ. अर्चना सिंह यांचे आवाहन

अलिबाग : शहर वार्ताहर

शारीरिक आजारांपेक्षा मानसिक आजारांकडे समाजाची पाहण्याची दृष्टी वेगळी असते. मानसिक आजाराचे वर्गीकरण अनेक प्रकारे करता येते. सामाजिक विषमता, बेकारी, आर्थिक असुरक्षितता या सर्व गोष्टींमधून नैराश्य, आत्महत्येची प्रवृत्ती, आक्रमकता, गुन्हेगारी, मानसिक असंतुलन, इत्यादी अनेक मनोविकार निर्माण होतात. मानसिक आजार निर्माण होण्यामध्ये या घटकांचा मोठा वाटा आहे असे मत जिल्हा मानोसोपचार तज्ञ डॉ. अर्चना सिह यांनी कार्यक्रमा प्रसंगी केले.



पीएनपी वेश्वी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग रायगड, व्यसन मुक्ती दिवस यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य व आजारासंबंधी माहिती या विषयी प्रशिक्षण शिबिराचे पीएनपी संकुलांच्या सभागृहा मध्ये आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग जिल्हा मानोसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे, समाजसेवक अधिक्षक विशाल दामोदर, भाग्यश्री खोत, मंगेश म्हात्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्या संजीवनी नाईक, कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र पाटील, प्रा. प्राजक्ता कवी, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे मार्गदर्शन करताना डॉ. अर्चना सिह यांनी व्यसनाधीनता, व्यसनामुळे देशावर आणि समाजावर होणारा परिणाम, मानसिक आरोग्य म्हणजे काय ? मानसिक आजार म्हणजे काय ? मानसिक आजाराची कारणे कोणती ? मानसिक आजाराची सुरुवात कशी होते ? मनोरुग्ण कसा ओळखावा ? आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाचे योगदान या विषयी सविस्तर माहिती दिली.

महत्त्व हे राज्यातील एकमेव कर्मचारी असे म्हणावे लागेल.

# चेंढरे येथे स्वच्छता, प्लास्टिकबंदी जनजागृती मोहिमेचे आयोजन

## रायगड जिल्ह्यात सर्वच ठिकाणी कार्यक्रम

## पीएनपीच्या मुलांनी दिला स्वच्छतेचा संदेश

| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय वेश्वी-अलिबाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामपंचायत चेंढरे यांच्या संयुक्त विद्यमाने चेंढरे ग्रामपंचायत येथे स्वच्छता व प्लास्टिकबंदी जनजागृती मोहीम राबविण्यात आली. देशात तसेच मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत रायगड जिल्ह्यात सर्वच ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद सदस्य प्रियदर्शनी पाटील, चेंढरे उपसरपंच संदेश पाटील, सदस्य ॲड. परेश देशमुख, प्रशांत फुलगावकर, सदस्य अनिता शेंडे, शर्मिला पाटील, ममता मानकर, मिथुन बेलोस्कर, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, जनशिक्षण संस्थान अलिबाग, विजय कोकणे, रुपाली नाईक, पाणी व स्वच्छता विभाग पंचायत समिती अलिबाग, पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी रवींद्र पाटील व श्वेता गुरव व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जनजागृती कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १००० कागदी पिशव्या तसेच जनशिक्षण संस्था यांच्याकडून १०० कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्यात आल्या.



पायी रॅली चेंढरे ग्रामपंचायत, ईझी शॉपी, रोहिदास नगर, पिंपळभाटपर्यंत काढण्यात आली होती. रॅलीमध्ये घोषवाक्य बॅनर पथनाट्य कागदी पिशवी वाटप, कापडी पिशवी वाटप, स्वच्छताघडी पत्रिका वाटप, स्वच्छता शप्पथ अशा विविध माध्यमातून जनजागृतीचे काम करण्यात आले. रॅलीचा समारोप पिंपळभाट नवीन बस स्टॅंड येथे करण्यात आला. पंचायत समिती पाणी व स्वच्छता विभाग यांच्याकडून स्वच्छतेची शपथ देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी पीएनपी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्वेता गुरव यांनी आभार मानले.

कृषीवल





पी.एन.पी. महाविद्यालयात मराठी भाषा दिनानिमित्त मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण अलिबाग नगरपरिषद उपनगराध्यक्षा अॅड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पी.एन.पी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्या प्रा. संजीवनी नाईक, बी. एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमचंद्र ससाणे, त्याचप्रमाणे मराठी विभाग प्रमुख प्रा. नम्रता पाटील, प्रा. डॉ. ओमकार पोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

---

लोकमत

# कर्णबधिर पायल पाटीलला ८०.३० टक्के

विशेष प्रतिनिधी ।
लोकमत न्यूज नेटवर्क



अलिबाग : जिद्द आणि चिकाटी असेल तर शारीरिक कमतरतेवर सहज मात करता येते हे पायल पाटील हिने दाखवून दिले आहे. अलिबागजवळच्या ग्रामीण भागातील घोटवडे येथील पायल नरेश पाटील पूर्णत: कर्णबधिर असलेल्या पायल पाटील या गुणी विद्यार्थिनीने बारावीच्या कला शाखेतील परीक्षेत ८०.३० टक्के गुण मिळवून पीएनपी शैक्षणिक संस्थेत प्रथम क्र मांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकाविला आहे. तिने दहावीच्या परीक्षेत सुद्धा ९० टक्के गुण मिळवून ती प्रथम आली होती. पायलची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने तिला पीएनपी शैक्षणिक संस्थेमार्फत पूर्णपणे मोफत शिक्षण दिले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, जिद्द व चिकाटीने मिळवलेले पायलचे हे यश इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

वेश्वी येथील पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या बारावी परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करून पीएनपीची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. पीएनपी होली चाईल्ड उच्च माध्यमिक इंग्रजी माध्यम स्कूलचा निकाल १०० टक्के, तसेच कला, वाणिज्य व विज्ञान विद्यालयातील एकूण ८७.७६ टक्के निकाल लागला.

पीएनपी विद्यालयातील कला शाखेतील निकाल ८२.२२ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८८ टक्के लागला आहे. मयूर राऊत याने ७७.२३ टक्के गुण मिळवून शाखेत प्रथम येण्याचा मान पटकाविला, तर विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९०.२४ टक्के लागला असून यामध्ये मानसी म्हात्रे हिने ६२.४६ टक्के गुण मिळवून प्रथम क्र मांक पटकाविला.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, पीएनपी होली चाईल्ड स्कूलच्या प्राचार्या गीतिका भूचर, प्रशासन अधिकारी अमित देशपांडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Hello Raigad
Page No. 3 May 29, 2019
Powered by: erelego.com



लोकमत

कर्णबधिर पायल पाटीलला ८०.३० टक्के

माथेरानमधील गिरीस्थान नग

कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक २९ मे २०१९

# पीएनपीच्या यशाची परंपरा कायम

## पीएनपी शैक्षणिक संस्थेत पायल पाटील प्रथम

### जिद्दीच्या जोरावर मिळविले यश

सकाळ

## पीएनपी शैक्षणिक संस्थेत पायल पाटील प्रथम

होली चाईल्ड स्कूलचा १०० टक्के निकाल

टाइम्स

कर्णबधीर पायलच्या जिद्दीची कहाणी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

www.pudhari.com

पीएनपी संस्थेत पायल पाटील प्रथम

पुण्य नगरी

# कर्णबधीर पायलच्या जिद्दीची कहाणी

बारावीच्या परीक्षेत ८० टक्के गुण मिळवून संस्थेत पहिली

लोकसत्ता

कर्णबधीर पायलच्या जिद्दीची कहाणी

टाइम्स

कर्णबधीर पायलच्या जिद्दीची कहाणी

मोरवाडी

बनविण्य

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-18/2015-17 ALB-(31-12-2017)

कृषीवल

# प्लॅस्टिक प्रदूषणाला प्रतिबंध करा : मिलिंद दुसाने

## पीएनपी महाविद्यालयाचा श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन सोहळा संपन्न



पीएनपी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबीरप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने. सोबत अनिल पाटील, जयवंत गायकवाड, संजीवनी नाईक आदी. (छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभाग व जिल्हा स्वच्छता व पाणी मिशन कक्ष जिल्हा परिषद अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने प्लॅस्टिक बंदी व मासिक पाळी व्यवस्थापन जनजागृती मोहीम पीएनपी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा विभाग यांच्यातर्फे सदर शिबीर सहाण येथील रा.जि.प. प्राथमिक शाळा येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने, जिल्हा पाणी व कक्ष कार्यक्रम अधिकारी जयवंत गायकवाड, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस अनिल पाटील, प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, प्रा. रवींद्र पाटील, प्रा. प्राजक्ता कवी, प्लॅस्टिक बंदीसाठी विशेष योगदान देणारे मुकेश जैन व सुधीर आठ्ठावकर, सहाण उपसरपंच नंदकुमार तुणतुणे, सहाण ग्रा.पं. तंटामुक्ती अध्यक्ष नारायण वर्तक, रमेश पाटील, पीएनपीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणारे अडथळे दूर करण्यातील महत्त्वाचा अडथळा ठरलेल्या प्लॅस्टिकला अटकाव करण्यासाठी त्याच्या वापरावर बंदी घालण्याचा निर्णय महाराष्ट्रात घेण्यात आला आहे. डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात प्लॅस्टिक पिशव्यांचा मोठा अडथळा होता. एकदा निर्माण झालेले प्लॅस्टिक हे कधीच नष्ट होत नाही. वापरून त्याचे तुकडे पडून ते इतत्र जमिनीत, समुद्रात, नदी-नाल्यात मिसळत जाऊन ते प्राण्यांच्या तोंडी येतात. काही वेळेस असे प्राणी मनुष्याच्या पोटात गेल्यावर प्लॅस्टिकचा अंश आपल्याही पोटात जात असतो आणि वेगवेगळे आजार निर्माण होत असतात. पूर्वीच्या काळी समारंभाच्या वेळी जेवण्यासाठी पळसाच्या पानांचा वापर केला जात असे आणि त्याचे विघटनसुद्धा योग्य प्रकारे होत असे. मात्र, आता प्लॅस्टिक वापर सर्रास केला जात आहे आणि याचे विघटन होत नाही, हीच मोठी समस्या [illegible] आहे. [illegible] अशी परिस्थिती [illegible] निर्माण झाली आहे. प्लॅस्टिक प्रदूषणाला प्रतिबंध करा, असे मत मिलिंद दुसाने यांनी मांडले. यावेळी जयवंत गायकवाड, अनिल पाटील, प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सर्व विद्यार्थी आणि ग्रामस्थांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राजक्ता कवी, तर प्रास्ताविक प्रा. रवींद्र पाटील यांनी केले.

# महिला अत्याचार रोखणे गरजेचे

## उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांचे प्रतिपादन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

स्त्रियांचे नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर पडण्याचे प्रमाण जसजसे वाढत आहे तसतसे त्यांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली पाहिजेत, असे प्रतिपादन अलिबाग नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय आणि बी.एड. महाविद्यालय तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक अत्याचार' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पी.एन.पी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश [illegible], उपप्राचार्या संजीवनी नाईक, बी. एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमचंद्र [illegible], समन्वयक प्रा. नम्रता पाटील, प्रा. रामेश्वर राठोड व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ॲड. मानसी म्हात्रे यांनी अत्यंत परखडपणे आपली मते व्यक्त करीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. महाविद्यालयीन वय हे अजाणते असते, तेव्हा या वयामध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी चुकीची पावले उचलू नयेत. स्त्रियांचे नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर पडण्याचे प्रमाण जसजसे वाढत आहे तसतसे त्यांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. शाळा पातळीवर लैंगिक छळ विरोधी कायद्याची [illegible] चर्चा होत असते. स्त्रियांचे या विषयाची जागृती वेगवेगळ्या पातळीवर [illegible] जात असतेच, अर्थात आजही म्हणावी तशी त्याची अंमलबजावणी होत नाही. महिलांसाठी अनेक नवे कायदे आलेले आहेत, कायद्याचा अवलंब आणि जनजागृती करण्याचा सल्ला ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश [illegible] यांनी विद्यार्थ्यांशी [illegible] व्यक्त केली. [illegible] विद्यार्थी चुकीचे पाऊल [illegible], [illegible] पालक तसेच शिक्षकांशी [illegible]

[illegible]

ॲड. मानसी म्हात्रे यांनी अत्यंत परखडपणे आपली मते व्यक्त करीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. महाविद्यालयीन वय हे अजाणते असते, तेव्हा या वयामध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी चुकीची पावले उचलू नयेत.

दि. २/३/१८ दै. कृषीवल



# पीएनपी संकुलात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेद्वारे देशाला समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या त्रयीने समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शोषित असलेल्यांना सामाजिक, न्याय आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्याबाबत राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्या अनुषंगाने अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय म्हणून विविध कल्याणकारी योजना राज्यभर राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच त्याचे उद्देश साध्य व्हावेत, याकरिता राज्यात ८ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह दि. १३ एप्रिल रोजी एकदिवसीय पीएनपी संकुल वेश्वी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला.

यावेळी प्रमुख वक्ते व मान्यवर म्हणून माजी निवृत्त शिक्षक मुकुंद पाटणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड प्राध्यापक नामदेव चव्हाण, समाजकल्याण विभाग वरिष्ठ सहाय्यक आयुक्त किरण म्हात्रे, समाज कल्याण निरीक्षक रायगड अनिल मोरे, पीएनपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्या संजीवनी नाईक, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमचंद्र ससाणे, उपप्राचार्या रुतिशा पाटील, डी.एड. प्राचार्या नेहा म्हात्रे, इतर प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुकुंद पाटणे, प्रा. नामदेव चव्हाण, किरण म्हात्रे यांनी प्रबोधन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राजक्ता कवी तर आभार महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संजीवनी नाईक यांनी केले.

# मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

नैसर्गिक संप्रेरकामुळे होणाऱ्या बदलामुळे मासिक पाळी येते. याबाबत आजही उघडपणे बोलण्यास कोणीही धजावत नाही. मात्र मासिक पाळी हा आजार नसून ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, असे मत पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील

**पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांचे मत**

यांनी व्यक्त केले. दि. २५ जानेवारी रोजी पीएनपी महाविद्यालयात आयोजित हेल्थ अँन्ड हायजिन या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी अस्मी संस्थेच्यावतीने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी पॅड डिस्पोझल मशिन देण्यात आली. त्या मशिनचे चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी डॉ. प्रणाली पाटील, अस्मी संस्थेचे अध्यक्ष संतोष महाजन, अलिबाग शाखेचे पदाधिकारी रुपेश म्हात्रे, संजय पाटील, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संजीवनी नाईक, कुमन सेलचे सदस्य निशा कामकर, पल्लवी पाटील, नम्रता पाटील, नम्रता चोगले तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे मार्गदर्शन करताना चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, परदेशात मासिक पाळीबाबत जनजागृती आहे. मात्र आपल्या देशात याबाबत कोणीही बोलत नाही. देश प्रगतीच्या दिशेने जात आहे. मात्र मासिक पाळीवरील बंधने कायमच आहेत. याशिवाय अपुऱ्या ज्ञानामुळे अंधश्रद्धा तसेच धार्मिक विचार यावर लादण्यात आले आहेत. पुरोगामी विचारांची असल्यामुळे मासिक पाळीवरील बंधने समाजाच्या सांगण्यावरुन नाही तर वैयक्तिक विचारातून असली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय पीएनपी एज्युकेशनच्या शाळा सर्वत्र असून एसटी पोहोचण्याआधी त्या गावात पीएनपी ही शाळा पोहोचली आहे. असा शाळांमध्येही अस्मी संस्थेच्यावतीने पॅड डिस्पोझल मशिन लावण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच डॉ. प्रणाली पाटील यांच्या प्रयत्नामुळे महाविद्यालयाला पॅड डिस्पोझल मशिन मिळाल्यामुळे त्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी डॉ. प्रणाली पाटील यांनी मुली किशोरवयात येताना येणारे शारीरिक तसेच मानसिक बदल, त्याबाबत घ्यावयाची काळजी, अज्ञानपणा याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच याबाबत [illegible]




हेल्थ अँन्ड हायजिन या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील. (छायाचित्र : [illegible])

---

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2020)

बुधवार, दि. २८ फेब्रुवारी २०१८

२

# पीएनपी महाविद्यालयात मराठी भाषा दिन उत्साहात साजरा



मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित प्राध्यापक वृंद व विद्यार्थी. (छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'जागतिक मराठी भाषा दिन' मंगळवारी पीएनपी वेश्वी संकुल सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुसुमाग्रज यांच्या जीवनपट विद्यार्थ्यांसमोर उलगडण्यात आला. मराठी भाषेचे संवर्धन व कवी कुसुमाग्रज यांचा साहित्यपट, मराठी विभागप्रमुख प्रा. नम्रता पाटील, प्रा. डॉ. ओमकार पोटे यांनी माहिती रुपात विद्यार्थ्यांना पटवून दिला. तर प्रभारी प्रा. संजीवनी नाईक यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. सदर कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



पीएनपी वेश्वी संकुलात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पीएनपी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एमबीएचे प्राचार्य डॉ. योगेश पाटील, बीएडचे प्राचार्य डॉ. हेमचंद्र ससाणे, प्रा. ऋतिषा पाटील, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, होली चाईल्डच्या मुख्याध्यापिका गितीका भूचर आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कवायतींचे आणि देशभक्तीपर गाण्यांचे सादरीकरण केले. (छायाचित्र : अमोल नाईक)

# पीएनपी संकुलात जागतिक रेडिओ दिवस साजरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक रेडिओ दिवस साजरा करण्यात आला, याचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे Program on -mateur Radi हा कार्यक्रम राबविण्यात आला.

पीएनपी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर प्रमुख मान्यवर म्हणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक आर.बी. पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग अलिबागचे सागर पाठक, स्काऊट गाईड कमिशन सातारा जिल्हा मुख्याधिकारी ए.एस. जाधव, वसंत कुळे, परशुराम कुळे, दिलीप बापट, ए. आर. मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



रेडिओ प्रणालीची आपत्ती व्यवस्थापनात होणारी मदत याविषयी मार्गदर्शन करताना सागर पाठक. यासोबत प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, आर.बी.पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. (छायाचित्र : अमोल नाईक)

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिलीप बापट यांनी सांगितले की, फार वर्षांपूर्वी रेडिओ हेच मनोरंजनाचे साधन होते. पण, त्याचा उपयोग मनोरंजनापेक्षा पाड्यापाड्यासारखा जास्त व्हायचा. पूर्वीचा काळ आणि आताचा काळ यामध्ये जमीन-आसमानाचा फरक आहे आताचे युग हे डिजिटलचे युग आहे. त्याचप्रमाणे एकंदर रेडिओबद्दल माहिती दिली. Ham Operetor परीक्षा संदर्भात माहिती देऊन मुलांना प्रोत्साहित केले. रेडिओ प्रणालीची आपत्ती व्यवस्थापनात होणारी मदत सागर पाठक यांनी पटवून दिली. आर.बी. पाटील यांनी पोलीस दलात रेडिओ प्रणालीचा उपयोग कसा होतो, हे पटवून दिले. Wireless Communication साठी वापरण्यात येणाऱ्या Ham -matour Redio उपकरणांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख प्रा. रवींद्र पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. श्वेता पाटील यांनी केले व आभार प्रा. स्नेहा पाटील यांनी मानले.



# पीएनपी, जेएसएम, लक्ष्मी-शालिनी महाविद्यालयात रेडरिबन क्लब

। कोर्लई । वार्ताहर ।

युवा वर्गामध्ये एच.आय.व्ही. एड्स आजाराबद्दल गावोगावी जनजागृती करण्यासाठी अलिबाग येथील पी.एन.पी. व को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महाविद्यालय तसेच जे.एस.एम. महाविद्यालयात रेडरिबन क्लबची स्थापना करण्यात आली.

रेडरिबन क्लबच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमामध्ये शिबिराच्या ठिकाणी एच.आय.व्ही. एड्स आजाराबद्दल संपूर्ण माहिती देण्यात येऊन या आजाराबद्दल असलेले गैरसमज दूर करून जनजागृतीद्वारे अधिकाधिक लोकांची तपासणी करण्यात यावी, असे आवाहन जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील आय.सी.टी.सी. समुपदेशक कल्पना गाडे, अर्चना जाधव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित सोनावणे, सुजाता तुळपुळे यांनी केले आहे. यावेळी पी.एन.पी. महाविद्यालयाचे प्रा. संजीवनी नाईक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र पाटील, प्रा. श्वेता गुरव, प्रा. अमिता महाले, को.ए.सो.चे प्राचार्य मारुती भगत, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

---

कृषीवल www.krushival.in | रायगड | 16/08/19
रायगड, नवी मुंबई, ठाणे

# पीएनपी संकुलात स्वातंत्र्यदिन साजरा





वेश्वी येथे पीएनपी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, दुसऱ्या छायाचित्रात स्वातंत्र्यदिन सोहळ्याला उपस्थित विद्यार्थी. (छायाचित्र : [illegible])

। अलिबाग । प्रतिनिधी ।

वेश्वी येथील पीएनपी शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पीएनपी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एम.बी.ए कॉलेजचे प्राचार्य डॉ. योगेश पाटील, बी. एड.

## मुख्याध्यापिका रिना म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण

महाविद्यालयाच्या प्राचार्या संजीवनी नाईक, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, होली चाईल्डच्या मुख्याध्यापिका गितीका भूचर, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, प्रा. ऋतुषा पाटील, शिक्षकेतर [illegible] व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येथील शैक्षणिक संकुलात महाविद्यालयीन, माध्यमिक, प्राथमिक तसेच पूर्व प्राथमिक या तीनही विभागांच्यावतीने एकत्रित स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम साजरा केला जात असतो. गुरुवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ध्वजाला मानवंदना देण्यात आली.

शालेय विद्यार्थी आपले गणवेश परिधान करून या सोहळ्याला उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांचा उत्साह यावेळी मोठ्या प्रमाणावर जाणवत होता. राष्ट्रीय सण साजरे करण्याच्या निमित्ताने मुलांमध्ये देशप्रेमाची भावना निर्माण होत असते. तीच भावना यावेळी स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये पाहायला मिळत होती.

# पी.एन.पी. महाविद्यालयात संविधान दिन साजरा

| अलिबाग | प्रतिनिधी |

पी.एन.पी. महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधान बनविण्यासाठीचे योगदान विद्यार्थ्यांना समजण्यासाठी त्यावर एक चित्रफित दाखवण्यात आली व तसेच भारतीय संविधानाला अनुसरून विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा. नम्रता चोगले यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. मिलिंद घाडगे व आभार प्रदर्शन प्रा. महेश बेंद्रे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छायाचित्र : अमोल नाईक)

कृषीवल

## पीएनपी महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीर

# महिलांनी स्वावलंबी बनावे

## सरपंच निखिल मयेकर यांचे प्रतिपादन



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे पी.एन.पी. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजन अंतर्गत शिबीर नुकतेच संपन्न झाले. या निमित्त नागाव ग्रा.पं.वतीने विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात नागाव हायस्कुलच्या इयत्ता नववी व दहावी इयत्तेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महिलांनी स्वावलंबी बनावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमास नागाव ग्रा.पं.सरपंच निखिल मयेकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तर नागाव ग्रा.पं.सदस्या हर्षदा मयेकर, मंजुषा राणे, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. प्रणाली पाटील, जिल्हा परिषद स्वच्छता विभाग प्रमुख जयवंत गायकवाड, नेहा जाधव तसेच पी.एन.पी. महाविद्यालयाचे प्राचार्य संजीवनी नाईक व शिक्षकवर्ग आदी मान्यवरांसह विद्यार्थीवर्ग उपस्थित होते. प्रारंभी पी.एन.पी.महाविद्यालयाचे वतीने प्राचार्य संजीवनी नाईक यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ प्रदान करून स्वागत केले.त्यानंतर नागाव ग्रामपंचायतीच्या व राजिपच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी हेल्थ पब्लिक सॅनिटेशन, अँण्ड पर्सनल हायगीन क्लीयरनेसचे मार्गदर्शन शिबीर राबविण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना नागाव ग्रा.पं.सरपंच निखिल मयेकर यांनी प्रत्येक स्त्रीचा आदर व्हायलाच हवा, महिलांच्या सुरक्षिततेची प्रत्येक पुरुषांनी जबाबदारी स्वीकारावी, महिलांनीसुद्धा स्वावलंबी बनावे, तसेच महिलांची पाळी ही अडचण न समजता तो जीवनाचा एक भाग आहे हे समजून घेतले पाहिजे व स्वतःचे आरोग्याची काळजी घ्यावी असे विचार निखिल मयेकर यांनी मांडले. या निमित्त नागाव ग्रामपंचायतीमार्फत सरपंच निखिल मयेकर यांचे हस्ते सर्व मुलींना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.

# जागतिक एड्स दिनानिमित्त अलिबागेत जनजागृती रॅली



। अलिबाग । वार्ताहर ।

जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवड्यानिमित्त अलिबाग येथे जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अजित गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संदीप वीरभद्र स्वामी, लायन्स क्लब श्रीबागचे अध्यक्ष अंकित बंगेरा व चित्रलेखा पाटील, ला. निहा राऊत, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

रॅलीची सुरुवात जिल्हा सामान्य रुग्णालयातील प्रांगणामध्ये होऊन सदरची रॅली एस.टी. स्टॅन्ड, शिवाजी पुतळा, बालाजी नाका या मार्गे पुन्हा जिल्हा सामान्य रुग्णालय येथपर्यंत नेण्यात आली. रॅलीमध्ये उपस्थित युवक युवतींनी तसेच लायन्स क्लब श्रीबाग ... सर्व सहभागींनी विविध घोषणा देत जनजागृती केली.

> समाज कोणत्याही क्षेत्रात बदल घडवू शकतो या म्हणीनुसार लोकसहभागातून एड्स निर्मूलन हा एक सामाजिक कार्याचा भाग असून समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन एड्सविरोधी लढा तीव्र केल्यास हा आजार व एचआयव्ही विषाणू हद्दपार होईल
> — डॉ. अजित गवळी, जिल्हा शल्यचिकित्सक

या रॅलीमध्ये नर्सिंग स्कूल, जेएसएम कॉलेज, पीएनपी कॉलेज, लायन्स क्लब श्रीबाग यांचे सर्व अधिकारी व पदाधिकारी गिरीश म्हात्रे, गौरी म्हात्रे, हर्षद घरत, नेहा घरत, संतोष साखरे, बाबासाहेब चौगुले, कला पाटील, वैशाली बंगेरा, डॉ. स्मिता पाटील, डॉ. दीपक गोसावी, डॉ. पांडुरंग शिंदे, डॉ. नालंदा पवनारकर, डॉ. सुरेश देवकर, मोरे, नवनाथ लबडे, जिल्हा रवींद्र कदम, जिल्हा सहाय्यक लेखा, रश्मी सुंकले, संपदा म्हात्रे, अर्चना जाधव, कल्पना गाडे, अनिल खंडाळे, सुजाता तुळपुळे, अमित सोनवणे, गणेश सुतार, हेमकांत सोनार, महेश घाडगे, किरण पाटील, बिलनर स्नेहा पाटील, संकेत घरत यांनी सदरची रॅली यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



यावेळी पोलीस निरीक्षक अलिबाग यांचेमार्फत नियुक्त पोलीस कर्मचारी यांनी आवश्यक ते सहकार्य केले. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील एआरटी केंद्र, रक्तपेढी, आयसीटीसी, एसटीआय/आरटीआय विभागातील अधिकारी व कर्मचारी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीकरिता उपस्थित असणाऱ्या अधिकारी कर्मचारी तसेच महाविद्यालयातील युवक युवतींना लायन्स क्लब श्रीबाग व ना. चित्रलेखा पाटील यांच्यामार्फत अल्पोपहार व बिसलरी पाणी पुरवठा करून सामाजिक बांधिलकीतून एआरटी केंद्र, अलिबाग येथे उपचाराकरिता आलेल्या एचआयव्ही संसर्गित व्यक्तींना सुद्धा अल्पोपहार व बिसलरी पाणी पुरवठा करून विशेष सहकार्य केले. सूत्रसंचालन डॉ. दीपक गोसावी, रक्तसंक्रमण अधिकारी, रक्तपेढी, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांनी केले.

---


कृषीवल
www.krushival.in
रायगड
[illegible]




पीएनपीच्या संकुलात 'माझा कुलाबा' जल्लोषात









# पीएनपीच्या संकुलात 'माझा कुलाबा' जल्लोषात

। अलिबाग । प्रतिनिधी ।

[illegible]



# पीएनपी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला उजाळा

। कुसुंबळे । वार्ताहार ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातर्फे नुकतेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती मोठ्या उत्साहपूर्वक वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग सचिव व न्यायाधीश संदीप स्वामी, पीएनपी महाविद्यालयाच्या प्राचार्या संजीवनी नाईक, कला अधिष्ठाता प्रा. नम्रता पाटील, डॉ. ओमकार पोटे, डॉ. रसिका म्हात्रे, विधी प्राधिकरण स्वयंसेविका व पत्रकार जीविता पाटील, कनिष्ठ लिपिक प्रणीता मगर व समस्त प्राध्यापक वर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी न्या. संदीप स्वामी यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेत सुसंवाद साधला. समाजातील प्रत्येक पुरुषाने स्त्रीचा सन्मान केला पाहिजे असे मत त्यांनी यावेळी मांडले. तर जीविता पाटील यांनी कार्यक्रमाचा उद्देश व या दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. महाविद्यालयाच्या प्राचार्या संजीवनी नाईक यांनी समाजातील ढासळत्या नितीमूल्यांवर भाष्य करीत पुरुषाने आपला विवेक आणि स्त्रीने आपले स्त्रीत्व जपले तर नक्कीच समाजात परिवर्तन घडेल असे विचार आपल्या अध्यक्षीय वक्तव्यात व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओमकार पोटे तर आभार प्रदर्शन डॉ. रसिका म्हात्रे यांनी केले.

# जिजाऊ, विवेकानंद जयंतीनिमित्त पीएनपीमध्ये वाचन परंपरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आणि ग्रंथालयाच्यावतीने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कला शाखा विभाग प्रमुख प्रा. नम्रता पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, कार्यालय विभाग प्रमुख प्रा. दिनेश पाटील, ग्रंथपाल कांचन म्हात्रे,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.मिलिंद घाडगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

ग्रंथपाल कांचन म्हात्रे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये आजच्या दिवसाचे महत्व सांगत असताना महाविद्यालयातील वाचन दिनाचा आढावा घेतला. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राध्यापक मिलिंद घाडगे यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर ऐतिहासिक दृष्टिकोनातून भाष्य केले.

कला विभाग प्रमुख प्राध्यापक नम्रता पाटील यांनीही आजच्या वाचन दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वाचन हे किती महत्त्वाचे आहे याचे महत्व पटवून दिले. आपल्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे विवेचन करत असताना आपल्या पद्य साहित्यावर प्रकाश टाकला. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी दिनानिमित्त महाविद्यालयाची वाचन परंपरा ग्रंथालयामध्ये कायम सुरू ठेवली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सण गुढीपाडव्याचा परंपरा आणि नवता

**'' आला चैताचा, हर्षाचा पाडवा**
**संगे गावा मराठीचा गोडवा ''**

आज चैत्र शुध्द प्रतिपदा म्हणजेच आपला मराठमोळा सण गुढीपाडवा होय. मराठी महिन्यातील नववर्षाचा हा प्रारंभदिन तसेच शालिवाहन संवत्सराचा पहिला शुभदिन म्हणूनही ओळखला जाणारा हा मुख्य सण सर्वांना हवाहवासा वाटतो. या महिन्यामध्ये अनेक सण, उत्सवांची परंपरा जोपासण्याची आपली संस्कृती आहे. शब्दाला तेलगु भाषेमध्ये काठी असे संबोधले जाते. या काठीला आपण भरजरी वस्त्र, चाफ्याच्या फुलांची माळ, आंब्याचा, कडूनिंबाचा पाला, बत्तासेयुक्त गाठीची माळ आदींनी सजवून त्यावर धातूचा तांब्या अथवा लोटा ठेवून ती सूर्योदयानंतर आकाशाच्या दिशेने उंचावर उभी करण्याची आपली संस्कृती आहे. हे विजयाचे आणि समृध्दीचे प्रतिक मानले जाते. गुढीबरोबर आपण सर्वांना आवाहन करीत असतो. काठी हे रक्षणाचे प्रतिक, कडूनिंब अर्थातच उत्तम आरोग्याचे प्रतिक, गाठीमाळ हे मिष्टान्नाचे प्रतिक, भरजरी वस्त्र हे समृध्दीचे प्रतिक तर चाफ्याची माळ हे व्यक्तिमत्त्व दरवळण्याचे प्रतिक मानून या गुढीची साग्रसंगीत स्थापना दारामध्ये करण्याची आपली परंपरा आहे.

याबाबत माझ्या बालपणीची आठवण सुखदायक आहे. चैत्र महिना उजाडला की सण आणि उत्सवाची जय्यत तयारी सुरु असायची. प्रभूरामचंद्र यांच्या उत्सवाची नवरात्र या दिनापासून सुरु होत असे. पूर्वी गुढी उभारताना दोन दिवस आधीपासूनच घर आणि अंगण शेणाने सारवायला सुरुवात होत असे. सणाच्या आदल्या दिवशी हव्या त्या उंचीप्रमाणे बांबू विक्रेत्यांकडून बांबू घेताना किती उत्सुकता असायची. पहाटे सकाळी सकाळी आंब्याची डहाळी, कडूनिंबाचा पाला आणि चाफ्याची फुले यांची शोधमोहिम कितीतरी वेळ चालत असे. त मन दोन्हींची उर्जा कायम असायची. दारी झेंडूचे आणि आंब्याच्या पानांचे तोरण, देवदेवतांना हार आणि फुलांची आरास आणि अंगणात गुढीपाडव्याची तयारी. सकाळी लवकरच उठून स्नान उरकून नवीन कपडे घालायचे आणि गुढीपाडव्याच्या पूजेला वडिलधारी मंडळींच्या सूचनेप्रमाणे तयारीत रहायचे. ब-याचदा पूजेची पूर्वतयारीसाठी घरातील सर्व मंडळी व्यस्त असल्याने नावडीचे काम वाट्याला येत असे. ते काम म्हणजे सहाणेवर चंदन उगाळणे. कितीतरी वेळा चिडचिड व्हायची. त्यात तो चंदनाचा खोड झिजलेला असला की मनामध्ये गुढीपेक्षा अढीला सुरुवात होत असे. त्यातही कमाल म्हणजे अजून लागेला थोडे चंदन असे म्हटले की, संताप अनावर होत असे; पण ऑप्शन नव्हता बरं का! चंदन उगाळण्याचा कार्यक्रम झाला की, पूजेची उत्सुकता अनावर होत असे. म्हणजे स्वच्छ धुवून वस्त्राने पुसलेल्या काठीचे गुढीमध्ये होत असलेले रुपांतर पाहण्यासाठी डोळे आतुर होत असत. आई पूजेबरोबरच जेवणाच्या तयारीमध्ये व्यग्र असायची. गुढीच्या काठीला बोटाने चंदन लावून मग त्यावर हळद, कुंकू आणि अक्षता लावणे हे काम आवडत असे. तोपर्यंत बाबा आणि काका गुढीच्या वरील भागात भरजरी वस्त्र, तांब्या, गाठीच्या माळा बांधून घेत असत. अखेर गुढी उभी करताना तिचा डौल सांभाळीत ती दर्शनी भागात उभारणे आणि उंच उभारताना तिला खालून वर पहात न्याहाळून बघणे हा आनंद काही औरच असायचा.

गुढीवरुन भरजरी कपडा किंवा साडी खाली वा-याच्या झोतामध्ये लहरणे असो, गुढीच्या तळाशी मांडलेल्या कलश पूजेचा थाट असो वा निरंजन धूपबत्तीचा दरवळणारा मंद सुवास असो सणाचे सणपण त्या आठवणींच्या हिंदोळ्यामध्ये अजूनही दरवळत आहे. पूर्वी कधीतरी होणारे गोड-धोड पदार्थांचे पक्वान्नाचे जेवण म्हणजे सर्वांसाठीच

एक मेजवानी असे. आत्ता श्रीखंडोचे वेगवेगळे प्रकार आहेत. केशर, बदाम, पिस्ता, आम्रखंड, स्ट्रॉबेरी, अननस, मिक्स फ्रुट, सिताफळ वगैरे. परंतु तो तेव्हा वस्त्रगाळ केलेला किंवा अनेकदा विकत तयार आणलेला चक्का बाबांनी आणला की आई अत्यंत कुशलतेने त्याचे श्रीखंडामध्ये रुपांतर करीत असे. तो पूरीबरोबर खाताना तितक्याच चवीची बटाटा भाजी मात्र पानामध्ये आवर्जून असते. मुख्य म्हणजे एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये या व सणातील नात्यांचा गोडवा टिकून जपण्याची ही रितभात असायची. सध्या विभक्त कुटुंब पध्दतीमुळे रिती, परंपरा, संस्कृतीमध्ये सुध्दा विभक्तता येताना दिसून येत आहे.

सध्याच्या काळामध्येही हा सण साजरा होत आहे. उत्सुकता तिच आहेर; फक्त स्वरुप बदलले आहे. पूर्वी सणासाठी आवर्जून वेळ काढला जात असे. सध्या मोबाईलवरुन शुभेच्छांचा आणि स्टेटस पाहण्याच्या व्यस्त कार्यक्रमामुळे हा जीवंत आनंदाला आपण मुकत चाललो आहोत. आता फुलांचेच पहाना ! पूर्वी आदल्या रात्री झेंडूच्या आणि आंब्याच्या पानाच्या माळा करण्यात जी मजा होती ती सध्या बाजारात मिळणा-या नकली प्लॅस्टीक माळांमधून कधीच हद्दपार चालली आहे. आत्ताची मुले कॉन्व्हेंटमध्ये शिकत आहेत. त्यांना गुढीपाडव्याची गुढी म्हणजे डेकोरेटीव्ह स्टीक वाटायला नको म्हणजे मिळवलं. त्यामुळे आपणच आपली ही संस्कृती जोपासणे आवश्यक आहे. संस्कार हे मागच्या पिढीकडून पुढील पिढीकडे होत असतात आणि आपल्याला करायचे आहे. हेच तर खरे आपले दातृत्व आहे. त्यामुळे आपण सर्व हा पाडव्याचा सण आनंदाने साजरा करुन आपली संस्कृती आणि आनंद द्विगुणित करुयात. आपल्या सर्वांना गुढीपाडव्याच्या आणि नववर्षाच्या हार्दीक शुभेच्छा.



**-डॉ. ओमकार विनायक पोटे**
**प्राचार्य**
**पी. एन. पी. महाविद्यालय, वेश्वी, अलिबाग** (९४०३०९४१३०)

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कटिबद्ध

कुरुळ ग्रामपंचायतीचे सदस्य अवधुत पाटील, माजी नगरसेवक प्रदीप नाईक, ॲड.प्रसाद पाटील, सुजाता पाटील, डॉ. प्रणाली पाटील, दिग्दर्शक राजन पांचाळ, प्रसाद लोध यांच्यासह पीएनपी महाविद्यालयाचे संचालक प्रा. विक्रांत वार्डे, प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्रा. रवींद्र पाटील, इतर प्राध्यापक, संकुलातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अद्ययावत प्रयोगशाळांचे नूतनीकरण व उद्घाटन समारंभ पीएनपीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते तसेच आरसीएफच्या सहकार्यातून पार पडला. यावेळी आरसीएफचे पदाधिकारी व इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. विज्ञान या क्षेत्रातील वनस्पतीशास्त्र/प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, अजैविक/ऑर्गेनिक व भौतिक विश्लेषणात्मक तसेच एमएस-सीआयटी/आधार केंद्र या प्रयोगशाळांचे पीएनपीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील तसेच आरसीएफ मुख्य पदाधिकारी व पीएनपी महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व सर्व सहकार्यांकडून पाहणी करण्यात आली. पीएनपी महाविद्यालयात शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची यावेळी आरसीएफच्या पदाधिकाऱ्यांना ओळख करून देण्यात अली.

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कटिबद्ध

## चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन; पीएनपी महाविद्यालयात अद्ययावत प्रयोगशाळांचे उद्घाटन



। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांना प्रगत आणि उच्च शिक्षण मिळावे, यासाठी पीएनपीच्या माध्यमातून विविध अद्ययावत संकल्पना साकारण्यात आल्या आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात येथील विद्यार्थी मागे राहू नये यासाठी त्यांच्या उज्वल भविष्यासाठी कायम प्रयत्न केले जातआहेत. यापुढेही विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवून त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन पीएनपीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी केले. पीएनपी शाळेत बुधवारी (दि.२२) अद्ययावत प्रयोगशाळांचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, शशिकांत दुबळे, सोजे,

•> पान २ वर

एमएस-सीआयटी/आधार केंद्राचा विद्यार्थ्यांना फायदाआम्ही फक्त शिक्षणच देत नाही, तर मुलांना नोकरीसाठी मार्गदर्शन व संधी पण देतो, हा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी पीएनपी महाविद्यालय एमएस-सीआयटी/आधार केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. जेणेकरून विद्यार्थ्यांना या सुविधांसाठी बाहेर जावे लागू नये, असे प्राध्यापकांकडून सांगण्यात आले.

---

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2015-17 ALB-(31-12-2017)

कृषीवल

# प्लॅस्टिक प्रदूषणाला प्रतिबंध करा : मिलिंद दुसाने

## पीएनपी महाविद्यालयाचा श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन सोहळा संपन्न



पीएनपी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबीरप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने. सोबत अनिल पाटील, जयवंत गायकवाड, संजीवनी नाईक आदी. (छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभाग व जिल्हा स्वच्छता व पाणी मिशन कक्ष जिल्हा परिषद अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने प्लॅस्टिक बंदी व मासिक पाळी व्यवस्थापन जनजागृती मोहीम पीएनपी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा विभाग यांच्यातर्फे सदर शिबीर सहाण येथील रा.जि.प. प्राथमिक शाळा येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने, जिल्हा पाणी व कक्ष कार्यक्रम अधिकारी जयवंत गायकवाड, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस अनिल पाटील, प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, प्रा. रवींद्र पाटील, प्रा. प्राजक्ता कवी, प्लॅस्टिक बंदीसाठी विशेष योगदान देणारे मुकेश जैन व सुधीर आग्रावकर, सहाण उपसरपंच नंदकुमार तुणतुणे, सहाण ग्रा.पं. तंटामुक्ती अध्यक्ष नारायण वर्तक, रत्नेश पाटील, पीएनपीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणारे अडथळे दूर करण्यातील महत्त्वाचा अडथळा ठरलेल्या प्लॅस्टिकला अटकाव करण्यासाठी त्याच्या वापरावरच बंदी घालण्याचा निर्णय महाराष्ट्रात घेण्यात आला आहे. डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात प्लॅस्टिक पिशव्यांचा मोठा अडथळा होता. एकदा निर्माण झालेलं प्लॅस्टिक हे कधीच नष्ट होत नाही. याउलट त्याचे तुकडे पडून ते इतरत्र जमिनीत, समुद्रात, नदी-नाल्यात मिसळत जाऊन ते प्राण्यांच्या तोंडी येतात. काही वेळेस असे प्राणी मनुष्याच्या पोटात गेल्यावर प्लॅस्टिकचा अंश आपल्याही पोटात जात असतो आणि वेगवेगळे आजार निर्माण होत असतात. पूर्वीच्या काळी समारंभाच्या वेळी जेवण्यासाठी पळसाच्या पानांचा वापर केला जात असे आणि त्याचे विघटनसुद्धा योग्य प्रकारे होत असे. मात्र, आता प्लॅस्टिक वापर सर्रास केला जात आहे आणि याचे विघटन होत नाही, हीच मोठी समस्या समाजासमोर आहे. जेवढा विकास जास्त, तेवढाच कचरा जास्त, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. प्लॅस्टिक प्रदूषणाला प्रतिबंध करा, असे मत मिलिंद दुसाने यांनी मांडले. यावेळी जयवंत गायकवाड, अनिल पाटील, प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्व विद्यार्थी आणि ग्रामस्थांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राजक्ता कवी, तर प्रास्ताविक प्रा. रवींद्र पाटील यांनी मानले.

शुक्रवार दि. २३ जून २०१७ टाइम्स

# ...रीरिकपेक्षा मानसिक आजारांकडे समाजाची पाहण्याची दृष्टी वेगळी: डॉ. अर्चना सिह

...ग २२ जून (वार्ताहर)- ... आजारांपेक्षा मानसिक ... समाजाची पाहण्याची दृष्टी ... मानसिक आजाराचे ... अनेक प्रकारे करता येते. सामाजिक विषमता, बेकारी, आर्थिक असुरक्षितता या सर्व गोष्टींमधून नैराश्य, आत्महत्येची प्रवृत्ती, आक्रमकता, गुन्हेगारी, मानसिक असंतुलन, इत्यादी अनेक मनोविकार



(छाया- अमोल नाईक)

निर्माण होतात. मानसिक आजार निर्माण होण्यामध्ये या घटकांचा मोठा वाटा आहे असे मत जिल्हा मानोसोपचार तज्ज्ञ डॉ. अर्चना सिह यांनी कार्यक्रमा प्रसंगी केले.

पीएनपी वेश्वी महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग रायगड, व्यसन मुक्ती दिवस यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य व आजारासंबंधी माहिती या विषयी प्रशिक्षण शिबिराचे पीएनपी संकुलाच्या सभागृहा मध्ये आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग जिल्हा मानोसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे, समाजसेवक अधिक्षक विशाल दामोदर, भाग्यश्री खोत, मंगेश म्हात्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्या संजीवनी नाईक, कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र पाटील, प्रा. प्राजक्ता कवी, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे मार्गदर्शन करताना डॉ. अर्चना सिह यांनी व्यसन/व्यसनाधीनता, व्यसनामुळे देशावर आणि समाजावर होणारा परिणाम, मानसिक आरोग्य म्हणजे काय? मानसिक आजार म्हणजे काय? मानसिक आजाराची कारणे कोणती? मानसिक आजाराची सुरुवात कशी होते ? मनोरुग्ण कसा ओळखावा? आणि रुग्णालयाचे योगदान या विषयी माहिती दिली.

# मानसिक आजारांकडे गांभीर्याने पहावे
## डॉ. अर्चना सिंह यांचे आवाहन

अलिबाग : शहर वार्ताहर

शारीरिक आजारांपेक्षा मानसिक आजारांकडे समाजाची पाहण्याची दृष्टी वेगळी असते. मानसिक आजाराचे वर्गीकरण अनेक प्रकारे करता येते. सामाजिक विषमता, बेकारी, आर्थिक असुरक्षितता या सर्व गोष्टींमधून नैराश्य, आत्महत्येची प्रवृत्ती, आक्रमकता, गुन्हेगारी, मानसिक असंतुलन, इत्यादी अनेक मनोविकार निर्माण होतात. मानसिक आजार निर्माण होण्यामध्ये या घटकांचा मोठा वाटा आहे असे मत जिल्हा मानोसोपचार तज्ञ डॉ. अर्चना सिह यांनी कार्यक्रमा प्रसंगी केले.

पीएनपी वेश्वी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग रायगड, व्यसन मुक्ती दिवस यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य व आजारासंबंधी माहिती या विषयी प्रशिक्षण शिबिराचे पीएनपी संकुलाच्या सभागृह मध्ये आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग जिल्हा मानोसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे, समाजसेवक अधिक्षक विशाल दामोदर, भाग्यश्री खोत, मंगेश म्हात्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्या संजीवनी नाईक, कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र पाटील, प्रा. प्राजक्ता कवी, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे मार्गदर्शन करताना डॉ. अर्चना सिंह यांनी व्यसनाधीनता, व्यसनामुळे देशावर आणि समाजावर होणारा परिणाम, मानसिक आरोग्य म्हणजे काय ? मानसिक आजार म्हणजे काय ? मानसिक आजाराची कारणे कोणती ? मानसिक आजाराची सुरुवात कशी होते ? मनोरुग्ण कसा ओळखावा ? आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाचे योगदान या विषयी सविस्तर माहिती दिली.



# शुभारंभ 'प्रभाविष्कार'चा



'प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी प्रभाविष्कार २०१७-२०१८' क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून करण्यात आला. यावेळी पीएनपी एम.बी.ए महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनुजकुमार मिश्रा, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, होली चाईल्ड मुख्याध्यापिका गीतिका भूखर, माध्यमिकचे मुख्याध्यापक निलेश मगर, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, क्रीडा प्रशिक्षक तेजस म्हात्रे आणि संकुलातील विद्यार्थी मोठ्या